**वाचा :** 1. शासन महसूल व वन विभाग , मंत्रालय मुंबई-32 यांचे पत्र क्र.केओटी/4688/प्र.क्र.65/ई-10 दिनांक 11.04.1996
2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग , मंत्रालय मुंबई-32 यांचे पत्र क्र.केओटी/4688/ प्र.क्र.65/ई-10 दिनांक 23.06.1997
3. वित्त विभाग शासन निर्णय क्र. बीजीटी-1000/प्र.क्र.13/अर्थसंकल्प/99, दि.29.06.2000
4. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक स-30/4200/प्र.क्र.635/ई-10 दिनांक 19.07.2001
5. महाराष्ट्र शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर-1209/प्र.क्र.69/सेवा-9 दिनांक 29.04.2009

जा.क्र.2010/अ-2/आस्था-1/कावी
जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक :-17.02.2011

**आदेश :**

संदर्भीय परिपत्रक 4 मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे विविध प्रवर्गातील जिल्हा अस्थापनेवरील रिक्त पदे लक्षात घेता कोतवाल संवर्गातून शिपाई वर्ग-4 या संवर्गात खालीलप्रमाणे निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला वर्ग-4 संवर्गात ( शिपाई) या रिक्त पदावर वेतनबँड रुपये 4440-7440 मध्ये ग्रेड वेतन 1300 या वेतनबँड मध्ये त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे केवळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती व पदस्थापना खालील शर्ती व अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | श्री.संघेकर दिगंबर बळीराम | खुला | शिपाई, तहसिल कार्यालय हिंगोली श्रीमती बलखंडे यांचे बदलीमुळे रिक्त पदी |

01. उक्त उमेदवाराची शिपाई वर्ग-4 संवर्गामधील नियुक्ती ही नविन नियुक्ती समजण्यात येते व त्यांनी यापूर्वी धारण केलेले कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्याने त्या पदावरील सेवेचा विचार कोणत्याही कारणास्तव वर्ग-4 च्या शिपाई या पदावरील सेवेचे फायदे देताना करण्यात येणार नाही.

02. नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी उक्त उमेदवाराला कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

03. उमेदवाराची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता व कोणतीही पुर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

04. उमेदवारास सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्यापूर्वी या कार्यालयास नोटीस देणे आवश्यक आहे अथवा एक महिन्याचा मूळ पगार अगोदर जमा करावा लागेल.

05. उमेदवाराने शारीरिक स्वास्थ्य वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याबाबतची महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये जिल्हा शल्य चिकीत्सक हिंगोली यांच्याकडून प्राप्त करुन 2 महिन्याचे आत दाखल करणे बंधनकारक राहील.

06. उमेदवारांना मुळ प्रमाणपत्रे सादर करावे लागतील, त्या शिवाय संबंधित अधिकारी यांनी उमेदवारास रुजू करुन घेऊ नये.

07. चारित्र्याबाबत पोलीस अहवालात उमेदवाराची वर्तणूक चांगली आढळून न आल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यात येईल.

08. उक्त उमेदवारांनी नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**(शैला ए.)**
**जिल्हाधिकारी हिंगोली**

**प्रतिलीपी :**

1. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई -32 यांना माहितीस्तव.
2. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. अपर जिल्हाधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव.
4. सहाय्यक जिल्हाधिकारी हिंगोली / वसमत यांना माहितीस्तव.
5. जिल्हा कोषागार अधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव.
6. राष्ट्रीय सुचना विज्ञान अधिकारी, एन.आय.सी. हिंगोली यांना हिंगोली जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी देण्यात येते.
7. तहसिलदार, हिंगोली / कळमनुरी यांना माहितीस्तव.
8. या कार्यालयाचे लेखा शाखेस माहितीस्तव.
9. संबंधितास (श्री.संघेकर दिगंबर बळीराम) मार्फत तहसिलदार कळमनुरी.

**जिल्हाधिकारी हिंगोली**